| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**<br>**फोन नं. ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


**प्रेसनोट २३१-२२** **दिनांक २९/०७/२०२२**

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्ताने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने आयोजित रक्तदान शिबीरामध्ये १८७ जणांनी केले रक्तदान.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पुर्ण झाल्याचे निमीत्ताने संपुर्ण भारत देशामध्ये ‘स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव’ साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने देखील वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये आयुक्तालयातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांची ७५ किलोमिटर धावण्याची शर्यत, हर घर तिरंगा, रक्तदान शिबीराचे आयोजन व इतर कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

दिनांक २९/०७/२०२२ रोजी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ मिरारोड कार्यालयाचे वतीने नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील कम्युनिटी हॉल, नयानगर मिरारोड पुर्व येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये परिमंडळ-१ मधील नयानगर, मिरारोड, नवघर, भाईंदर, काशिमिरा, उत्तन पोलीस ठाणे, सहा. पोलीस आयुक्त कार्यालय मिरारोड व भाईंदर, पोलीस उप आयुक्त कार्यालय येथील पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच सामान्य नागरिकांनी मोठया उत्साहाने सहभाग नोंदवून एकुण १८७ जणांनी रक्तदान केले आहे. त्यामध्ये १०६ पोलीस अधिकारी/अंमलदार व ८१ सामान्य नागरिकांचा सहभाग आहे.

सदर रक्तदान शिबीराचे वेळी श्री अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, श्री शशीकांत भोसले, सहा पोलीस आयुक्त, नवघर विभाग, श्री शांतीलाल जाधव, सहा. पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, श्री जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नयानगर पोलीस ठाणे, इतर पोलीस अधिकारी/अंमलदार व नागरिक उपस्थित होते.





